• सातारा, शनिवार, २८ सप्टेंबर २०१९

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# हिंदी अध्ययनातून रोजगाराच्या अनेक संधी

## प्रा. डॉ. राजेंद्र भोसले; कोरेगावला डी. पी. भोसले कॉलेजात हिंदी दिवस

**सातारा, ता. २७ :** हिंदी विषयाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजेंद्र भोसले यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात हिंदी विभागातर्फे हिंदी दिवस प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. भोसले बोलत होते. हिंदी साहित्याचे महत्त्व सांगताना प्रा. डॉ.



**कोरेगाव : हिंदी दिवस कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. राजेंद्र भोसले. समवेत प्रा. आर. के. मुल्ला, प्रा. डॉ. एस. डी. जाधव, डॉ. इन्नुस शेख व प्रा. टी. यू. मुल्ला.** **(छायाचित्र : सुमित बर्गे, कोरेगाव)**

भोसले यांनी मातृभाषेबरोबरच इतर भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. हिंदी भाषा ही नात्यांमध्ये गोडवा निर्माण करणारी आहे. सध्याच्या काळात जागतिक पातळीवर हिंदी भाषेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आज काल अनेक क्षेत्रात हिंदी भाषेला वाव मिळत असल्याचे नमूद केले.

उपप्राचार्य डॉ. जाधव यांनी हिंदी भाषा ही सर्वांना जोडणारी भाषा असल्याचे सांगून त्यांनी हरिवंशराय बच्चन यांच्या कवितांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. हिंदी दिनानिमित्त महाविद्यालयात हिंदी निबंध, हिंदी वक्तृत्व, सुलेखन, काव्यवाचन, भित्तिपत्रक, कविता लेखन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याला विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

चित्रा बोतालजी हिने प्रास्ताविक केले. हिंदी विभागप्रमुख प्रा. आर. के. मुल्ला, डॉ. इनुस शेख यांनी पाहुण्यांचा परिचय व स्वागत केले. सुजाता मेटगार हिने आभार मानले. पूजा भोसले व पूजा कदम यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी विद्यालयातील ज्युनिअर विभागातील हिंदी विभागाचे प्रा. पोरे, प्रा. विवेक माने व महाविद्यालयातील प्राध्यापक, सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.